म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2329

# हे बंध अंतरीचे

( काव्यसंग्रह )

REFBK-0022070
REFBK-0022070

श्री. मा. बा. जोशी

सौ. मनोरमा जोशी

काव्य
संदर्भ

# हे बंध अंतरीचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३६६९ काव्य
दा. क्र.
22060
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

( काव्यसंग्रह )

प्रस्तावना - कुसुमाग्रज

द्वितीय आवृत्ती
[ सुधारून वाढविलेली ]

कवि- श्री. मा. बा. जोशी

कवयित्री- सौ. मनोरमा जोशी

पहिली आवृत्ती–
१२ एप्रिल १९७५ (गुढीपाडवा)

दुसरी आवृत्ती–
(सुधारून वाढविलेली)
२० मार्च १९७७ (गुढीपाडवा)

प्रकाशक–
मा. बा. जोशी
प्रकाश प्रकाशन
११०५, शुक्ल सदन, मेनरोड, नासिक

मुद्रक–
नीलकण्ठ शंकर कासार
विकास मुद्रणालय, शनिचौक, पंचवटी, नासिक–३

पृष्ठसंख्या– ६०

किमत – पाच रुपये

# मातृ - स्मृतीस

REFBK-0022070

# प्रस्तावना

## शुभेच्छा !

श्री. जोशी आणि सौ. जोशी हे दांपत्य आपल्या अंतरीचे काव्यबंध या छोटया संग्रहाच्याद्वारा वाचकांना सादर करीत आहे. श्री. जोशी यांनी सरकारी नोकरीत एक कर्तव्यदक्ष आणि सरळ रस्त्याने जाणारा अधिकारी म्हणून लौकिक मिळवला आणि आपल्या स्नेहशीलपत्नीच्या सहाय्याने प्रपंचही नेटका केला. श्री. जोशी हे समाधानी मनाने आता नोकरीतून निवृत्त झाले आहेत. 'सज्जनांच्या जीवनाला वेदनेचा शाप का ?' असा प्रश्न मनात निर्माण करणारे काही तापदायक अनुभव या दांपत्याला आलेले असणारच.

दिव्याचा प्रकाश मिळविताना दिव्याचा दाहही केव्हा सहन करावा लागतो. पण या अनुभवामुळे जोशी पतिपत्नीची सुजनता खचली नाही किंवा स्वीकृत जीवनमूल्यांदरील त्यांचा विश्वासही ढळला नाही. या समाधानी, सौजन्यशील वृत्तीचे प्रतिबिंब उभयतांच्या या सरळ, साध्याभोळया कवितेत पडलेले आहे. प्रौढवयात त्यांना कवितेची ओळख झाली आणि तिच्यावर त्यांचे अपत्यवत् प्रेम जडले. किंबहुना डोळयासमोर चितारलेल्या 'घरकुला' च्या सुन्दर स्वप्ना मध्ये जी रिती जागा दैवानं निर्माण केली ती भरून काढण्यासाठी कविता त्यांना सहाय्य करू लागली.

ही कविता अशी आत्मरंजनासाठी, सांत्वनासाठी, भोवतालच्या परिसरापर्यंत मनोगत पोचविण्यासाठी अवतरलेली. तिने निर्मात्याला समाधान दिले हेच महत्त्वाचे. गौरीपुढे हौसेने गाणाऱ्या महिलेच्या गाण्याला रागदारीच्या कठोर कसोटचा लावणे बरोबर नाही. तरीदेखील या संग्रहांतील घरकूल, आम्ही वेडे, जीवन संगीत, सज्जनांच्या जीवनाला, आई, मातृस्मृती, अभागी यांसारख्या कित्येक कविता वाचकांच्या मनात सहानुभवाची तार छेडतील यात शंका नाही. या प्रेमळ दांपत्याचे मागणे 'लई' नाही. त्यांच्या अंगणात फुललेल्या या फुलांचा सुगंध त्यांना लाभला तसा आणखी काही वाचक मित्रांना लाभो–एवढेच

ही त्यांची अपेक्षा पुरी होवो !

ही माझी शुभेच्छा– एक मित्र म्हणून.

वि. वा. शिरवाडकर
( कुसुमाग्रज )

# साहित्यिक म्हणतात...

तुम्हा पति-पत्नीची पद्यरचनेत गती आहे. व आपली सुखदुःखे तुम्ही मोकळेपणाने या संग्रहात प्रगट केली आहेत. परम गहन असा सेवा धर्म काटेकोरपणानं आचरीत असतांना तुम्ही दोघांनी आपल्या मनाचा एक कोपरा जुन्या काळातल्या माजघराप्रमाणें या छंदाकरिता राखून ठेवलात याचं कौतुक वाटलं.

वि. स. खांडेकर

आकारानं छोटा पण गुणांनी मोठा असा हा संग्रह. आधुनिक काव्यापासून हे बन्ध अन्तरीचे खूपच अंतरावर आहेत. तांबे-गडकरी काळाशी आणि काव्याशी जुळेल असं काही रसायन यात आहे. त्याच्यावर झेपावणारे माझ्यासारखे रसिक भृंग अनेक असतील. त्याना रमा-माधवांची कविता आनन्द देईल.

वि. मा. दी. पटवर्धन

" स्नेह जाणे स्नेहभाषा आपुली " अशी ही स्नेहशीलता मनोरमा-माधव ह्यांच्या अंगी दिसून येते. साध्या आणि सरळ भाषेत ह्या कवि, कवयित्रीने आपली मनोगते सांगितली आहेत. जीवनाची अर्धी अधिक वाटचाल केल्यानंतर ह्या काव्यप्रपंचाचा आरंभ आहे. साधनेनें तो अखेरी साध्य व्हावा.

सोपानदेव चौधरी

आपली कविता आज जे वळण प्रचलित आहे त्यापेक्षा जुन्याकडे अधिक कललेली आहे. अर्थात त्यात वाईट असे काही नाही. आपल्या प्रकृतिप्रमाणेच आपण लेखन करतो. आपला प्रयत्न त्या दृष्टीने अत्यंत प्रामाणिक आहे. आपणास मी सुयश चिंतीतो.

वा. ल. कुलकर्णी

आपली अभिरुची, आयुष्याकडे पाहण्याची प्रसन्नवृत्ती, जीवनमूल्यांवरील श्रद्धा इ. विशेषांचे सुबोध चित्र या कवितात उमटले आहे. आपली उभयतांची कविता आपल्या जीवनातील एक निर्मळ शांतिस्थान होऊन राहिली आहे. यातच तिचे सार्थक आहे

कृ. ब. निकुम्ब

तुम्हा उभयतांच्या कवितेत कौटुंबिक जिव्हाळा ओथंबलेला आहे. तुमच्या कवितेचे स्वरुप साधे पण सुन्दर आहे. तुम्ही फार प्रांजळ वृत्तीने लिहिता. भावनेचे उत्कटत्व आणि सरलत्व चांगल्याप्रकारे व्यक्त झाले आहे. शब्द योजनाही ठीक आहे.

सूर्यकांत खांडेकर

काव्यसंग्रह तसा छोटासाच असला तरी काही काळ रसिकाला अंतर्मुख करण्याचे आणि काव्यानंद देण्याचे सामर्थ्य त्यात खचितच आहे. स्वतःचे दुःख विसरण्यासाठी, आत्मरंजनासाठी माणूस आपल्या अंगणात फुलबाग लावतो, परंतु त्या बागेतील फुलांच्या दर्शनाने आणि दरवळणाऱ्या सुगंधाने रस्त्यावरून जाणाऱ्या पांथस्थाच्या मनालाही आल्हाद मिळतो. तसाच आल्हाद ह्या काव्यसंग्रहाने रसिकांना मिळेल यात शंका नाही.

अ. वा. वर्टी

आपण नुसते जीवन काव्यमय केले नाही, तर काव्यातही जीवनाला महत्वाचे स्थान दिले आहे. यातच त्याच्या सफलतेचे रहस्य आहे. आपली काव्यरचना गेय व प्रासादिक आहे. आपल्या काव्याचा नेटकेपणा लक्ष वेधून घेतो. आपले उभयतांचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

मु. शं. किर्लोस्कर

सश्रद्ध मनाने घेतलेल्या अनुभूतीचे दर्शन घडविणारे सदरचे काव्य रसिक मनाला देवघरात तेवत ठेवलेल्या नंदादीपाप्रमाणे भासेल. जोशी दापत्याने जें अनुभवले ते साध्या सोप्या शब्दात काव्यातून गुंफले आहे. त्यांच्या कविता अनेकांना निश्चितच आवडतील.

योगेश्वर अभ्यंकर

# कृतज्ञता

"हे बन्ध अन्तरीचे" या आम्हा उभयतांच्या काव्यसंग्रहाची द्वितीय आवृत्ती रसिक वाचकांचे हाती देतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. अल्पावधितच द्वितीय आवृत्ती काढण्याचा रसिकांनी योग आणून दिला, त्या बद्दल त्यांना आम्ही धन्यवाद देत आहोत. अतिशय साशंकतेने आणि नम्रतेने प्रथमावृत्तिचा प्रयत्न आम्ही आपणापुढे ठेवला होता. सर्वसामान्यांच्या सुखदु:खाबद्दलच्या आणि कवितेतील अनुभूति ही कविचीच अनुभूति या सूत्राचा आधार घेऊन लिहिल्या गेलेल्या या कविता रसिक वाचकांना आवडतील असा विश्वासही प्रगट केला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्यानेच सुधारुन वाढविलेली ही दुसरी आवृत्ती रसिकांचे सेवेला सादर करणे शक्य होत आहे.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचे हार्दिक मार्गदर्शन व प्रेरणा याही संग्रहाला लाभली नसती, तर ही द्वितीय आवृत्ती निघणे केवळ अशक्य होते. त्यांची आपुलकी आणि जिव्हाळा याला तोड नाही. आम्ही त्यांचे सदैव ॠणी आहोत.

अनेक जेष्ठ श्रेष्ठ साहित्यिकांनी शुभेंच्छा दिलेल्या आहेत. त्यांचे ॠण शब्दातीत आहे. आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत.

आमचे जेष्ठ कविमित्र श्री. कोचरगावकर वकील, कविमित्र श्री. योगेश्वर अभ्यंकर तसेच श्री. रत्नाकर गुजराथी, सौ. अनुराधा औरंगाबादकर यांचे सततचे प्रोत्साहन आणि आपुलकीनें केलेले सहाय्य याचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. आम्ही त्यांचे आभारी आहोत

सदरहू काव्यसंग्रहात एकूण ५० कविता संग्रहित आहेत. त्यापैकी पहिल्या आवृत्तीतील सौ. मनोरमा जोशी यांच्या १ ते २१ व श्री. मा. बा. जोशी यांच्या २२ ते ३२ या कविता तशाच ठेवल्या असून पुढील कवितांपैकी ३३ ते ४४ या सौ. जोशी व ४५ ते ५० या श्री. जोशी यांच्या आहेत.

प्रथम आवृत्तीचे रसिकांनी मुक्त मनाने जसे स्वागत केले, तसेच या द्वितीय आवृत्तीचे होईल असा विश्वास वाटतो.

ज्या जगन्नियंत्याच्या प्रेरणेने ही द्वितीय आवृत्ती काढण्याचा संकल्प पूर्ण झाला, त्यांचेपुढे विनम्रभावे नतमस्तक होऊन आम्ही आपली अनुज्ञा घेतो.

माधव बाळकृष्ण जोशी
सौ. मनोरमा माधव जोशी

# अनुक्रमणिका

## कवयित्री - सौ. मनोरमा माधव जोशी

१) हे ईश्वरा करूणाघना २) ब्रीद ३) माझ्या भारत मातेचा ४) छत्रपति शिवराया ५) सज्जनांच्या जीवनाला ६) नच श्लेष अलंकार ७) घरकुल ८) कविवर्य भा. रा. तांबे यांचे स्मृतिस ९) अंतरीच्या बंधनांनी १०) जीवन-संगीत ११) हे बंध रेशमाचे १२) रेशमी नाजुक धागा १३) आली माहेरवाशीण १४) नरसोबा-वाडीचे दत्तस्थान बघुन १५) पादचारी १६) पति गेले ग कोल्हापुरी १७) आम्ही वेडे १८) आई १९) बाळा उतराई होऊ कशी २०) कृष्ण-महिमा २१) आजीची गोष्ट ३३) आंतरराष्ट्रीय महिला वर्ष ३४) प्रेरक शक्ती ३५) स्पर्श ३६) वेडेमन ३७) पाठवणी ३८) दुष्काळी जीवन ३९) गुन्हेगार ४०) मी आज पोरका होत ४१) प्रयाग संगम बघुन ४२) मला वाटते ४३) मागणे ते मागतांना ४४) जीवन प्रवास

## कवि - माधव बाळकृष्ण जोशी

२२) मातृ-स्मृति २३) हे बंध अंतरीचे २४) पावन क्षेत्र २५) जनसेवा २६) धन्य धन्य शिवाजीराजा २७) अभागी २८) गाई यशाची गाथा २९) वियोग ३०) ध्येयमार्ग स्वीकरी ३१) रांगोळी बघून ३२) अमुचा राम राम घ्यावा ४५) जीवन म्हणजे ४६) सहधर्मचारिणीस ४७) सासु-स्मृति ४८) संक्रमण ४९) कविश्रेष्ठा ५०) प्रिय रसिका

# हे ईश्वरा करुणाघना

हे ईश्वरा करुणाघना श्री राघवा रघुनंदना
जाणोनिया मम भावना द्यावे तुवा मज दर्शना
सर्वांतरी प्रभु राम तो भक्ता हृदी नित राहतो
झाली कृपा तुमची जरी नाही उणें मग जीवना

वैदेहिच्या प्राणेश्वरा अभय देसी मुनिवरा
दंडोनि असुरा भूवरी सुराज्य आणिले श्रीवरा
नामे रघूकुल भूषणा केले कृतिने सार्थ ना

एकबाणी अेकवचनी अेकपत्नी श्रीरघुनाथा
ब्रीद राखी ते अलौकिक भक्तवत्सल दीननाथा
केले तुवा जन पालना भरताग्रजा रघुनंदना

# ब्रीद

ओठी सदा असावे देवा तुझेच नाम
श्रवणात नित्य यावे तव स्तोत्र गूणगान
तुझिया कृपाबलाने ही हालचाल चाले
आहेस रोमरंध्री आम्हास नाही कळले
अज्ञान घालवोनी ज्ञानी सुबुद्ध करिसी
माया तुझी बघोनी विस्मीत मी मनासी
तू जरिही मंदिरात अससी विटेवरीही
परि पाठिशी उभा तू मज जाणवे सदाही
ये त्वरित देवराया ब्रीदास चालवाया
हे नेत्र अधिर झाले मूर्ति तुझी पहाया

# माझ्या भारत मातेचा

माझ्या भारत मातेचा आहे मला अभिमान
तिनेच दिले मला संस्कृतीचे वरदान
याच भूमीत जन्मला एक दानशूर कर्ण
मत्स्यनेत्रास भेदिले पार्थे जिंकोनीया पण
प्राणपणाने लढली इथे शूर झाशीवाली
पद्मिनीच्या जोहाराने काया शत्रुची थरथरली
युगपुरुष अलौकिक शिवराय छत्रपति
अेकनिष्ठ मावळ्यांचे शौर्य धैर्य वर्णू किती
देश आमुचा पावन सरिता ही गंगामाई
बुद्धी चातुर्याची खाण माता आदर्श जिजाई
संतश्रेष्ठ थोर थोर येथे होऊनिया गेले
देशभक्त क्रांतीवीर राष्ट्रासाठीही झटले
मर्यादा पुरुषोत्तम वाल्मिकीने वर्णीयेला
धर्मग्रंथ भगवद्गीता कृष्णमुखे प्रकटला
स्वराज्यात वाढो नित्य माझ्या देशाची या शान
वाणी सदैव आमुची गावो राष्ट्र - गुणगान

# छत्रपती शिवराय

अलौकिक युगपुरुष झाले छत्रपती शिवराय
सुपुत्र ऐसा जिने घडविला धन्य जिजाई माय

जिवावरीही उदार झाले अेकनिष्ठ मावळे
बलिष्ठ शत्रू जिंकुनी त्यांनी स्वराज्य स्थापियले
प्रजाहितास्तव नित्य झटे तो सत्यवादी शिवराय

राजनीतिहि निपुण असोनी निःस्पृहता ती न्यायदानी
निर्भयतेला सदैव वरुनी मातृआज्ञा श्रेष्ठ मानुनी
शिवप्रभूला भाग्ये लाभे रामदास गुरुराय

शूर - वीर अन मुत्सद्दीही रसिकता परि मनी वसे ही
प्राणघातकी संकट येता धैर्यानेही न डगमगता
शहाजी-सुत हा साहस करुनी यशस्वितेचे योजी उपाय

# सज्जनांच्या जीवनाला

सज्जनांच्या जीवनाला वेदनांचा शाप कां ?
दुर्गुणाच्या वर्तनाला तो तुझा उःशाप का ?

दीनता ही लीनता ही लाजवीते का तुला ?
आसुरी उद्दाम होणें आवडे कां हे तुला ?
वाटते वेड्या मनाला मजवरी अन्याय का ?

कर्म अमुचे भोगण्याला लाभला हा जन्म ना
कर्मयोगी होऊनीया संपवावे नियम ना
अंतरी नैराश्य दाटे वाटते संपेल कां ?

आळवावे आठवावे नित्य नैमित्तिक तुला
साथ नाही इंद्रियांची शल्य हे बोचे मला
सत्कृपा व्हावी तुझी ही आस पुरी होईल कां?

# नच श्लेष अलंकार

नच श्लेष अलंकार उपमा नसे नि ओवी
ते वृत्त छंद यातिल कळते मला न काही

परि एक शब्द येतो सामर्थ्य घेऊनीही
काव्यात गुंफताना जणु कोंदणी हिराही

अैसीच एक स्फुरली कविता कवीस साधी
जी अैकताच होई जागृत ती समाधी

भांडार जैं खुले तैं आकार शब्द घेती
आणि अनुभूतिने रसिका मनास भिडती

# घरकुल

आहे मनात माझ्या घरकूल छान एक
आम्ही असूनि दोघे अन् तान्हूलेहि एक

अधि दर्शनी असेल छोटी गणेश मूर्ति
त्या मूर्तिच्या प्रभेने उजळूनि जात भिंती

असुनी विहीर छोटी परसांत पारिजात
ती कृष्ण तुळस शोभे वाटे कसे प्रशांत

नाही दिवाणखाना साधी प्रसन्न खोली
जय राम कृष्ण हरि नादे भरुनि गेली

माता पिता नि बंधू भगिनी नि आप्त येती
सासू श्वशूर आदि गेहास भूषविति

हा बाळराज खेळे मांडूनि खेळ दारी
त्याचे विमान घेई त्या अंगणी भरारी

टाळ्या पिटीत धावे छोटा विमानतज्ञ
आई पहा – पहा ना माझे उडे विमान

मम नेत्रि स्वप्न तरळे येई भविष्यकाळ
हो तज्ञ राष्ट्रहीता दीर्घायु होई बाळ

# कविवर्य भा. रा. तांबे यांचे स्मृतीस

त्या काली असाही कवी होउनी गेला
कीं नमिले ज्याने मावळत्या भानुला

जरी अपार श्रद्धा होती ईशावरती
गाईली गीतांतून प्रेमाची ही महती

नववधू लाजरी पुत्रवियोगी माता
अन पत्नी वियोगी पुत्रा नुरली माता

किती विषय कथावे काव्य ही सुंदर सारे
शृंगार करुण रस चंद्र – चंद्रिका तारे

त्या रसिक वृत्तीने रसास्वाद ही घेता
आणि आदराने हा विनम्र होई माथा

# अंतरीच्या बंधनांनी

अंतरीच्या बंधनांनी

बांधुनी मी घेतले ।

माप ओलांडून येता

कौतुकाने नाहले

भाग्यशाली जीवनी मी

सर्व कांही लाभले ।

सूरतालासहित गाणे

मैफलीचे रंगले

# जीवन संगीत

जीवनाच्या संगिताला तू दिला ना सूरताल
म्हणूनीच माझ्या हाती मैफलीचा उष:काल

सूर जुळला ताल जमला खंजीरी मधून डोकावी
मोदाचा हा क्षण समेचा सर्वांनी टाळी द्यावी

परि अचानक त्या विणेची झंकारत तार तुटावी
हाय, म्हणोनी सोडी उसासा कैसे दैवी मायाजाल

सरली मैफल गेले सारे उरलो आपण दोघे
तार आवळुनी पुन्हा जुळवुनी उत्साहाने छेडिली वेगे

त्या नादाताच भान हरपलो परि कर्तव्या सदैव जागे
जाणीव ठेवून नश्वरतेची ध्यानी आणला तो गोपाल

# हे बंध रेशमाचे

नाते असे अतूट हे स्नेह बंधनाचे
धागे जुळूनी झाले हे बंध रेशमाचे

जरि वादळेहि झाली आल्या तुफान लाटा
परि तारु स्थिर राहे हे प्रेम संगमाचे

नव्हता दुवाही उरला परि ओढ अंतरीची
ठेवी सदैव भान कर्तव्य जागृतीचे

तो दूरचा किनारा मज गाठण्यास आता
सामर्थ्य गात्री राहो ईप्सीत हे मनिचे

ईशास प्रार्थना ही नित साथही रहावी
ओठात नित्य यावे ते नाम ईश्वराचे

# रेशमी नाजूक धागा

रेशमी नाजूक धागा  मनगटावर बांधियेला
बंधु माझा पाठिराखा  मजसि भाग्ये लाभलेला

बंधु भगिनी प्रेम ऐसे  ना कशाची तोड त्याला
बोट हरिचे कापले अन्  जीवही व्याकूळ झाला

रेशमी हा एक तंतू  मानलेले निर्मी नाते
पौर्णिमा वर्षा ऋतूची  भगिनीला ही मोद देते

# आली माहेरवाशीण

आली माहेरवाशीण ताई माझी भाग्यवान
थांब तिथेंच दारांत उतरीते लिंब-लोण
येती धावत भाचरे आणि माझ्या पाठोपाठ
मोद भरला दिसतो नेत्री त्यांच्या काठोकाठ

सान बाळाला घेण्यास उतावीळ होती भारी
आणि साखर पाप्यांच्या किती झडतात फैरी
लगबगीने बाहेरी येती दादा नि वहिनी
बाबा म्हणती 'गोकुळ' अवतरले अंगणी
जरी प्रेमाचे स्वागत होई ताईचे माहेरी
परि मधुनच तिच्या गोड हुरहूर उरी

# नरसोबावाडीचे दत्तस्थान बघुन

दत्ताचे हे स्थान प्रशांत प्रसन्न
होऊनिया लीन वंदिले चरण

कृष्णा पंचगंगा
झालासे संगम
दर्शनी आनंद सुखावले मन

पतीत तारिले
भक्त उद्धरीले
करोनी कल्याण दिले जीवदान

स्वयंभू पादुका
मूर्ति दिसे डोळा
पुजेचा सोहळा बघा थोर सान

मागणे हे आता
पायी भगवंता
संसारी रमता लागो तुझे ध्यान

# पादचारी

मी अेक पादचारी अपुल्या मनी विचारी
ही वाहनेहि सारी अति वेगवान भारी

जातात ती पहाना डौलात नि त्वरेने
येता समीप कोणी बघतात तुच्छतेने

नाही दिशा तयांना केव्हां कशीहि जाती
बाजूसहि चलाना आम्हास मात्र म्हणती

जातो अम्ही कडेने परि मागुनीहि येतो
नादातही तयांच्या कधि लोटुनीहि देती

मग जागृतीहि येई मार्गास त्याच वेळी
'धावा' कुणी म्हणे हो 'पकडा' अशी आरोळी

सारे खरे परंतू होई कृती न काही
जो तो उतावळीत गेहास जावयाही

होई कृतीही जेव्हा परि होतसे उशीर
निर्दोषही म्हणूनी अन्‌लागतो निकाल

अैसेच रोज चाले काही नसे उपाय
दे पंख देवराया नमिते तुझेच पाय

# पति गेले ग कोल्हापुरी

पति गेले ग कोल्हापुरी सखे ग हुरहूर दाटे उरी
कांहीं सुचेना खाण रुचेना कामा धामान श्रमले जरी

सांगितले जपाव जीवाला
खुशालीचे पत्र लिहायला
आले दाराशी मी बघायला
गेला टपालवाला पुढच्या घरी, मी निराश झाले पुरी

निज नाही ग रात्रंदिन
मनि चिंता करी हैराण
युगासमान वाटे क्षण
परि धरोनी धीर मी अधीर मना आवरी

केली देवाचरणी विनवणी
ठेवी सुखांत माझे धनी
त्यांच्या कामात यश येऊनी
परतु दे सत्वर घरी युवराज स्वागता करी

# आम्ही वेडे

आम्ही आहोत वेडे ठावे असे आम्हाला
या शाहण्या जगात मग राहणे कशाला ?

हा ही खुळा विचार स्पर्शून हृदयी गेला
परि मोह बंधनांनी हा जीव बांधलेला

या शाहण्या जगाची रीती अगीच न्यारी
प्रीती असे तयांची स्वार्थात भारलेली

रुचणार नाहि त्यांना त्यागातली कसोटी
मग काय त्यांनि घ्यावे ते रामनाम ओठी ?

वेडे अम्ही म्हणूनी ठरतीच हे शहाणे
कौतुकही अम्हाला असे अम्ही दिवाणे

आम्ही जरीहि वेडे सारे कळे अम्हाला
व्यवहार नाहि कांही परि धोरणे अम्हाला

आम्हास एक ठावे राहो सुखांत सारी
यशवंत थोर जगति मिळवोत कीर्ति भारी

# आई

कानांत साद घुमते अजुनी हि आई आई
आणि क्षणैक मूर्ती नेत्रासमोर येई

होता गतस्मृति ती व्याकूळ जीव होई
सोडूनि बाळ गेला दु:खात लोटूनीही

कांही कळे न मजला अपराध काय झाला
घडला गुन्हा न काही शिक्षा परी मला ही

किति मानसी मनीषा त्या थोर बांधियेल्या
परि आज त्या अखेरी साऱ्याच फोल झाल्या

मारील कोण हांक आई म्हणोनि मजसी
नाहीच कां नशीबी ही हांक अैकणेहो ?

वेडीच अेक आशा येईल बाळ माझा
घे गोल गोल पापा रडतेस ग ! कशाला

हे स्वप्न सत्य ठरु दे वाटे असे मनी हो
वेडीच एक माता विनवीत ईशपायी

# बाळा उतराई होऊ कशी

बाळा उतराई होऊ कशी
तुझ्यामुळे मी झाले माता समाधान मजसी

केले असते लालन पालन
तसे देऊनी उच्चही शिक्षण
कलागुणांना वाव हो देऊन
होती मनीषा मम मानसी उतराई होऊ कशी

तुझे पिताजी भारी प्रेमळ
स्वभाव त्यांचा आहे निर्मळ
दुर्दैवाने अमुच्या केवळ
निराशा आली अशी उतराई होऊ कशी

असे गृहाचा तूं कुलदीपक
सान थोरही करिती कौतुक
हर्ष जाहला तो आत्यंतिक
परि काळाने डाव साधिला नेऊनि त्या दिवशी

पदरी आली घोर वंचना
कुणा कथावी वृथा वेदना
कर्मयोग ही जगतो जाणा
शत्रुलाही दुःख असे हे देऊ नको हृषिकेषी

# कृष्ण-महिमा

रामकृष्ण हरी मुकुंदा मुरारी
श्रीरंगा श्रीहरी देवा नारायणा

विश्वाच्या चालका तुम्ही दयाघना
गळा वैजयंती माधवा मोहना

कंस वधोनिया वारिले भयाते
देवकी नंदना रुक्मीणी रमणा

द्रौपदीचा बंधु सुदामाचा सखा
भक्त पाठीराखा कृष्ण भगवान

दुष्टांचा संहार पतीत उद्धार
सोडविल्या नारी केले ते पालना

विश्वरुप दावी भक्त अर्जुनाला
सारथ्य करोनी आणी जयश्रीला

किती गूण वर्णू अलौकीक रुप
अच्युता अनंता वंदिते चरणा

## आजीची गोष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३२९
२२०८०
शाखा

आजीची गोष्ट घुमते कानी
अेक होता राजा न अेक होती राणी
अेक होता राजा न अेक होती राणी
गोष्टीची तऱ्हा ही झाली पुराणी
आता नाही राजा आणि नाही राणी
जनतेचे राज्य हीच घोषवाणी
पुर्वी होत्या घरोघरी चुली मातीच्या
हल्ली आहेत किचनमध्ये शेगड्या गॅसच्या
हल्लीच्या माणसांना उसंत नसते
त्यांच्यामागे सदाच धावपळ असते
पुर्वीच्या आजीला काकड्याची घाई
हल्लीच्या आजीला डब्याची घाई
घाईच्या ह्या जीवनात खूप प्रकार असतात
बस लोकल टॅक्सी विमाने धावतात
सभा मोर्चे लाठीमार गोळीबार अश्रुधूर
त्यांना तोंड देतांना काळजीला येतो पूर

महागाई सतत असते तोंड 'आ' वासून
बजेट बसवतांना जीव जातो त्रासून
अशा या गोंधळात रामनाम येत नाही
संकटकाळी आठवतो म्हणतो धावून येई
संकटाच्या तऱ्हा वेगवेगळया असतात
त्यांच्याशी झुंजतांना माणसे वैतागतात
नित्याच्या गरजा नोकरी अन् घर हवे
सारे कसे मनासारखे व्हायला हवे
तसे मात्र होत नाही निराशा पदरी येते
दैवाला दोष देऊन मन आक्रंदत राहते
आजी माळ जपते देवघरात बसून
विचारते देवाला बसला कां रुसुन
मागणे ती मागते सुखी ठेव सर्वांना
समृद्धीचे जीणें देऊन करी कृपादाना
पाठी येऊन मिठी घातली गळा आजीच्या
जीवनाचे सार्थक झाले वाटे मनि तिच्या
गोष्ट ऐकायची नातवाला झाली घाई
आजीचे नेत्र पैलतीरी गोष्टीत मनच नाही

## मातृ - स्मृति

कोण फिरविल गे पाठीवरुनि
मायेचा हात

कोण विचारील "बाळ आला कां ?"
संध्या समयास

अंगावरची तुझी घोंगडी देते
मजला ऊब

स्मृति तुझ्या त्या नित्य आणतील
मजलागी जाग

# हे बन्ध अन्तरीचे

हे बंध अंतरीचे तुटता कधी तुटेना
धाग्यात एक धागा जुळला कधी कळेना

जव देखिलें तुला गे हुरहूर लागी जीवा
माझाच मी न राही कळले मलाच तेव्हां

स्वर्गीय प्रीत फुलली मनमंदिरीच स्फुरली
सहवास तव घडावा ही एक आस उरली

हा दैवयोग जुळला अपुला विवाह झाला
मम पत्नी गे म्हणूनि सदनी प्रवेश केला

संसार रुपि रथ हा हाकू मिळून दोघे
लाभो सदैव वाटे आधार मज तुझा गे

ऋतुराज वसंत आला पानी मोहोर फुलला
चाहूल नव जिवाची लागे, आनंद झाला

काही उणे न मजला या जीवनी अता गे
लाभो सदाच साथ मम ध्येयपूर्तिला गे

# पावन क्षेत्र

श्रीरामाच्या चरणस्पर्शे पावन हे ग्राम
गोदा – अरुणा – सरस्वतीचा झालासे संगम

उभय तटावर शोभतात ती सुंदर देवालयें
संस्कृत प्राकृत परराष्ट्रीयही भाषा विद्यालये

प्रसिध्द असती द्राक्ष मळेही दिसती मंडप छान
उद्योगाचे क्षेत्र वाढले झाली उंचही मान

कथा कीर्तने तशी प्रवचने तात्त्विक वादविवाद
कविमंडळे नाटय प्रयोगही कधी मधी परिसंवाद

इथेच झाले शास्त्री पंडित अनेक क्रांतीवीर
इथे निपजले देशभक्तही वक्ते अन् शाहीर

इथे राहती कवी नि लेखक आणि नाटककार
गायन – वादन कलानृत्यही करिती ते साकार

चित्रकार कुणि चित्र चितारी घाटावर बसुनी
भवतालीचे भान नसे त्या अेकचित्त होऊनी

## जनसेवा

संत महंत दामाजीपंत
मंगळवेढी दयावंत

दीन दुबळे सान थोर
मुक्त केले धान्य भांडार

नाही पाहिले स्वार्थाला
अंगीकारी मानवतेला

कान्होपात्रा चोखामेळा
भक्तीमार्ग दावी वेळोवेळा

कितीतरी ऐशी नांवे
जनता जनार्दनी भावे

देशसेवा ईश्वरसेवा
कलियुगी मंत्र व्हावा

कृपालोभ चित्ती ठेवा
करा जनतेची सेवा

# धन्य धन्य शिवाजी राजा

धन्य धन्य शिवाजी राजा झटला ऽ प्रजाहित काजा
वाहिली शपथ मंदिरी
स्थापिन स्वराज्या परि
दुमदुमली ती रणभेरी
हरहर महादेव हो गर्जा झटला ऽ प्रजाहित काजा
जमविले मावळे शूर
घेऊनि भवानी तलवार
ठावे न कधी माघार
प्रेरणा देतसे जीजा झटला ऽ प्रजाहित काजा
सत्यनिष्ठ धीर अन् वीर
युगपुरुष जाहला थोर
जणु शिवाचाच अवतार
तज्ञ–सूज्ञ–न्यायी हा राजा झटला ऽ प्रजाहित काजा
जिंकिले गड अवघड
पराक्रमासी नाही तोड
शक्ति–युक्ति–बुध्दी अजोड
फोडिला तिमिर दरवाजा झटला ऽ प्रजाहित काजा
राज्याभिषेक तो करविला
ध्वज–दिन साजरा केला
आनंदी आनंद जाहला
शतवार नमन महाराजा झटलाऽ प्रजाहित काजा

# अभागी

प्रभात झाली वाहु लागला सुखद पवन तो अहा
फटाकडे अन् फुलबाज्यांचे गोड दृश्य ते पहा
जो तो उठतो घाईमध्ये लागे कार्याला
एक बोलवी दुसऱ्याला हो घरी फराळाला
आनंदाने पक्षी गाती पाही तरुवरती
रविराजाचे जणू स्वागता सिद्ध बहू असती
सृष्टी देविने शालू हिरवा केला परिधान
पिवळे रंगित काठ तयांचे दिसताती छान
आनन्दाने झुळझुळ झुळझुळ झरे वाहतात
परन्तु अैशा समयी कोणी होता दुःखात
हाय ! अभागी आपण, नाही भगिनी अपणाला
वाईट बहुतची वाटत होतें घडीघडी त्याला
कष्टामध्ये दिवस काढला त्याने तो सगळा
सायंकाळी नदीतीरावर जाऊनिया बसला
बन्धू घालील ओवाळणि अजि आत्मभगिनीला
मनात येता अश्रू खळकन् डोळ्यातुनि पडला
अश्रू अविरत येउ लागले एकान्ती त्यास
बघू नये कोणीही अपणा वाटे चित्तास

# गाई यशाची गाथा

कां असा निराश आणि क्रियाशून्य बा होसी
काय अन् कसे करु अशी खन्त मनी धरसी

ऊठ झडकरी कार्या लागी नव उत्साहाने
आळस झटकुनि करी प्रारम्भा कायावाचामने

धैर्य मानसी जोर मनगटी आणुनि लवलाही
सोडी भीती पाउल टाकी मार्ग पुढे पाही

दृष्टी टाकी तूं इतिहासी युवका स्फूर्ति घेई
स्वस्थ बैसणें माहित नसू दे लगबग वेगें जाई

स्वराज्य आपुले सुराज्य करण्या कटीबद्ध होता
तुझ्याकडे आशेने बघते अपुली भारत माता

'कर्मण्येवाधिकारस्ते" सांगे भगवद्–गीता
वैफल्याचे भाव सोडुनी गाई यशाची गाथा

# वियोग

प्रभूचा कोप हा झाला गुरुजीस घेउनी गेला
तुझी ही रिती कां ऐसी चांगल्या घेऊनि जाशी
अंध अन् पंगु किति असती सारे अन्नास्तव फिरती
नकोसा जीव ज्या होतो प्रभू त्या आयु बहु देतो
प्रयत्नें लावी गळफास ईश त्या देई ना यश
परंतु सज्जनाला या नेऊनि शिणविली काया
संगति नावडे आपणा आमुची फार दिवसांची
म्हणूनि सोडूनि गेला आम्हाला ईशलोकाला
जगी या भ्रष्टाचाराचा, पसारा माजला सारा
न्याय नीती नाही उरली विफलता कां मनी भरली?
टाळण्या सर्व ते गेला ठरवूनी स्वर्गभूमिला
आपुला आठव होतो शिष्यगण फार हळहळतो
" जगी ज्या असती वस्तुजात नष्टता त्यास येणार "
जगाच्या आदिपासोनी तत्त्व जे पुढे चालणार
परंतू दुःख मनि वाटे जेधवा स्मृती होई मजला
परमेशा शांती द्यावी मृताच्या अमर आत्म्याला

# ध्येय मार्ग स्वीकरी

घेई भरारी वरी युवका ध्येय मार्ग स्वीकरी
नवतारुण्ये जीवन भरले
रम्य बालपण तेही सरले
राष्ट्रघटक मी हेहि उमगले
मग चालु लाग सत्वरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी

मार्गी तव बहु कांटे असती
"कांट्यामधुनी गुलाब येती"
तत्त्व असे हे कसे विसरशी
धैर्य मानसी धरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी

धोंडा मोठा खळगे खांचा
लेश नसे जरि पथि सौख्याचा
धडा परंतु करो मनाचा
लंघण्यास पथ करि तयारी युवका ध्येयमार्ग स्वोकरी

दिसू लागल्या संकट सरिता
तरुनी जाई न डगमगता
असल्या कामी दावि निपुणता
तुज अपयश आले जरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी

हे बघ आले यशोमंदिर
मार्ग चालूनि दमशी फार
घेई विसावा मानि आभार
परमेशाचे मनि सत्वरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी

नवे नवे ते शोध लागती
ध्येयास्तव आत्माहुति देती
उद्दिष्टाला चिटकुनि बसती
नांव तयांचे गाजत राही परि, युवका ध्येयमार्ग स्वीकरी

## रांगोळी बघून

शिवरायाचे चरित्र ग्रथिले रांगोळी मधुनि
प्रसंग बहुविध साकारीले विविध रंग भरुनि
आनंदाने मन बहु धाले रम्य भाव बघुनि
अमरपुरीच्या बालचमूचे कौतुक वाटे मनी

## आमुचा राम राम घ्यावा

आम्हा प्रेमे निरोप द्यावा आमुचा राम राम घ्यावा
अडिच तपे जी सेवा केली
गोड मानुनि तुम्ही घेतली
कधी न्यूनता नाहि भासली
नाहि कुणाचा केला हेवा अमुचा राम राम घ्यावा
अनेक गांवे अनेक खेडी
फिरण्यांत मानिली गोडी
संधी लाभली परि जी थोडी
अनुभव गाठी नित्य नवा अमुचा राम राम घ्यावा
प्रेम दिले मज अति जनतेन
साक्ष देतसे मम अंतरमन
उतराई मी कसा होईन
संधि मिळावी करण्या सेवा अमुचा राम राम घ्यावा
दिवस आजचा संक्रमणाचा
दावि मार्गजो उत्क्रांतिचा
सेवा क्षण हा कृतार्थतेचा
आपुलकी अन् निष्ठा ठेवा अमुचा राम राम घ्यावा
समाधान बहु माझें चित्ति
जरी घेतसे अजि निवृत्ती
सहकारावरी माझी भक्ती
समृद्धीचा आहे ठेवा अमुचा राम राम घ्यावा
मजकरवि अन्याय जाहला
अधिक उणें बोललो कुणाला
उदार होऊनि करा क्षमेला
निवृत्तीतही साधिन सेवा अमुचा राम राम घ्यावा

# आंतरराष्ट्रीय महिला वर्ष

हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष
साजरे कराया मनी होतसे हर्ष

आदर्श जाहल्या महिला अमुचे देशी
देणार नाही मी हाति शत्रूच्या झांशी

प्रत्यक्ष कृतीने दावी ती शत्रूला
रणचंडी जेव्हां होते नाजुक अबला

ती माय जिजाई झाली शिवरायांची
अन् सून अहिल्या होती होळकरांची

त्या स्मृती तयांच्या स्फूर्ति अम्हा देतील
अन् उत्कर्षाचे पुढती पडे पाऊल

हा आहे अमुचा भारत देश महान
भारती – संकृति असे अम्हा अभिमान

जरी युगात आजच्या गरज जाहिरातीची
स्त्री देह प्रदर्शन खंत आमुच्या मनिची

आकर्षक होण्या चित्र असावे त्यात
प्रतिबिंब दिसावे सोज्वळतेचे त्यात

नव विचार धारा महिला वर्षी आणू
स्त्री- मने- जागृती कर्तव्य आमुचे मानू

# प्रेरक शक्ति

कधी होतसे प्रेरक शक्ति जीवन मार्गाची
उपभोगाची नाही केवळ जननी वीरांची

उदात्ततेची सोशिकतेची मांगल्याची ही मूर्ति
विपत्तीतुनी पार पडाया देते तुजिया स्फूर्ति

विविध समयिचे किती दाखले स्त्री कर्तुत्वाचे
वीज होऊनी लखलखणारी चमकोनी जाते

संस्कृति प्रीति शांति शक्ति विविध रुपे असती
गृहस्वामिनी जरि असली तरी राष्ट्राची प्रीति

निष्ठा ठेवुनि कर्तव्यावरि राखोनि समता
सेवाभावी वृत्ति असूनि अंतरि नित ममता

स्त्री ही केवळ नाही अबला दासी नच देवता
जीवन सार्थक करणारी ती तेजस्वी सरिता

# स्पर्श

तो स्पर्श सहज झाला
परि वाटले मनाला
नाते युगा युगाचे
सांगून मजसि गेला
ना भेट लोचनांची
खाणा खुणा न कांहीं
आधीच नाही ठरला
संकेत भेटीचाही
होते स्मृति ही जेव्हां
ती मोहवी मनाला
आशेवरीच पुढच्या
मी बांधिते मनोरा
मी बांधिते मनोरा

# वेडे-मन

वेडावल्या मनाला
समजूत ना कशी ती
कर्तव्य जागृतीने
धरिलाच धीर चित्ती
नैराश्य दाटुनी ये
आशा परि दुणावे
होईल सर्व कांही
जे वाटतेच व्हावे
ही भावनाच ठेवी
सारोनि दूर भीती
येता ममि विचार
हो उल्हासीत वृत्ति

# पाठवणी

जनक जननिचे आशिष घेउनि
दुहिता निघते पतिसदनी
कन्याधन हे हो परक्याचे
कुलद्वय जोडी स्नेहबंधनी
हुरहुर जरिहि मातेच्या मनी
आनंदाश्रू येति लोचनी
विरह सुतेचा आज होतसे
समाधान परि वदनि विलसे
कृतार्थतेचा क्षण मोदाचा
जीवन लाभे भाग्यवतीचा
लेक लाडकी सुलक्षणाही
नव्या युगाची युगंधराही
सौख्य संपदा समृद्धीनें
जीवन वेल तिची बहरावी

# दुष्काळी जीवन

दुष्काळी जीवन
अस्थिरता सारी
परि गाढ श्रद्धा
ठेवी कामावरी
कोणी एक दाता
देई अल्पदान
नको म्हणे माझा
जागा स्वाभिमान
फुका नको आम्हा
गाळु जेव्हा घाम
काम केल्यावरी
रोख ठोक दाम
दयाघना तुम्ही
असे कां कोपला?
मानसी संदेह
आज हा दाटला
करा प्रभो कृपा
पडो द्या पर्जन्य
होईल सुकाळ
समृद्ध जीवन

# गुन्हेगार

कोठे होतो कोठे आलो कोठे जाणार जीवन नौका
जीवघेण्या अेकांतात सुरु होते प्रश्न मालिका
ह्या भीषण दुष्काळात कोण साव कोण तस्कर
कसा नि कोण ओळखणार घेऊन पुराव्याचा आधार
काळया बाजाराने कोणी धान्याचे कोठार भरतात
आमचे कुटूंबीय मात्र भुकेने तडफडत असतात
ती तडफड नाही बघवली म्हणून छोटीशी घडली चूक
गुन्हेगार ठरलो तरी त्यांची भागवली अर्धी मुर्धी भूक
ठरलो गुन्हेगार कायमचा त्याचे मला दुःख नाही
पुन्हा असे नाही होणार याची मी देतो ग्वाही
संधी एकदा द्यावी दावाया प्रामाणिकपणा
थोडी दया दाखवा विनवितो पुनः पुन्हा
गुन्हेगार मी घडला असेल कधी एकदा गुन्हा
समाज पुरुषा क्षमा करी बा कुशीत घेई पुन्हा

# मी आज पोरका होत

हे हृदय होई व्यथित मी आज पोरका होत

मम माता सोडुनि गेली
दु:खाश्रु ओघळे गाली
परि शुश्रुषा मज घडली
हे समाधान मज नित्य मी आज पोराका होत

मजसाठी कष्ट बहु केले
मायेने मज वाढविले
देहाचे सार्थक झाले
वात्सल्य सदा हृदयात मी आज पोरका होत

प्रार्थना हीच ईशाला
चिरशांती लाभो तिजला
तव आशिर्वाद अम्हाला
ठेवतील नित्य सुखात मी आज पोरका होत

# प्रयाग-संगम बघून

गंगा-यमुना सरस्वतीचा संगम बघुनी मोद मनी
परस्पराते हितगुज करिति हेवा वाटे जरी मनी

निसर्ग सौंदर्याते बघुनी गेले मन मोहुनी
बघत रहावे सदा वाटते प्रवाह होडीतुनी

गंगामातेच्या अंकावर चिरनिद्रा घ्यावी
भाग्य कोठले इतुके अमुचे नश्वर संसारी

गिरिजेची ही सवत होउनि राहे शंभु शिरी
जनकल्याणा सदा वाहते डोंगर, भूमिवरी

लीन होउनी येई दर्शना मनिषा झाली पुरी
भाग्यवती मी झाले वाटे माझ्या जिवनांतरी

# मला वाटते

मला वाटते या श्रवणांनी
सुजन-वचन अैकावे

मला वाटते या नयनांनी
सदैव शिवचि पहावे

मला वाटते या हातांनी
देशकार्य नित व्हावे

मला वाटते या चरणांनी
धुंडित विश्व फिरावे

मला वाटते या वाणीने
गान गुणांचे गावे

मम देशाच्या महत्ततेचे
स्तोत्र मुखाने गावे

मला वाटते ईशाने हे
वांछित मम पुरवावे

# मागणे ते मागतांना

मागणे ते मागतांना
मागायाचे कळले नाही
दाता देणारा समर्थ
जाणतसे सर्व कांही

अनंत हस्ते दिले त्याने
काहीं कमी पडले नाही
पुर्व संचिताचा भोग
कुणालाही चुकला नाही

हसु आसूंचा हा खेळ
कधि सरशी कधि हार
परमेशाच्या लीलेचा
हाच मोठा चमत्कार

# जीवन-प्रवास

सदैव कानावरती येते निवास इथला निश्चित नाही
प्रवास आता बराच झाला स्टेशन अजुनी येतच नाही
उतरायाची वेळहि येईल गडबड घाई तेव्हां होईल
सहप्रवासी म्हणती सारे डाग आपुले बघुनीं घ्यारे
डाग कुणाचे कुणी आणले कोण नेतसे नाही कळले
"राहू तोवर रुसू नये जाते समयी पुसू नये"
जुनीच म्हण ही मनांत आली कृती तशी परि नाही घडली
सहजच आले ओठांमधुनी सांभाळा हो येते ना मी
ओळख असु द्या म्हणेल कोणी भेटू केव्हां कुठेहि आणि
आप्तमित्र अन् जीवनसाथी कन्या जाया बहुविध नाती
भेट व्हायची कोणे वेळी स्मृति ही, असेल कां ? ते काळी
निरोप घेता मन हे विव्हल काही नजरा व्याकुळ होतिल
नेत्र लागता पैल तिराला नाही बंधन मोह न कसला
दोन घडीचा डाव असे हा जाणिव होते तेव्हां हृदया
बंध जरी हे बहु प्रेमाचे सोडुनि आता निघावयाचे

# जीवन म्हणजे...

जीवन म्हणजे 'जीवन' आहे
गतीमानता त्यातचि राहे
सुखदु:खाचे रहाटगाडे
चक्रापरी ते फिरतची राहे
दरी डोंगरी कडे–कपारी
पुढे पुढे तो जातचि राही
'जन्म–मृत्यु' या मधील अंतर
असाच चाले ओघ निरंतर
भले बुरे ते अनुभव येती
दया क्षमा अन् मानवता ती
ज्यातचि होते मानव–क्रांती
त्यासी 'जीवन' अैसे म्हणती
जीवन म्हणजे कुंभ जलांचा
सतत झिरपणे त्याचे काम
चंदनापरी देह झिजविणें
यासी जीवन अैसे नाम

# सहधर्मचारिणीस...

ही माझी सहधर्मचारिणि गमे दैवे असे लाभली
जोडी ही जमवोनि योग्य विधिनें केली कृपा थोरली
आली स्वगृहि ही प्रवेश करिता आनंद वाटे मना
माझें भाग्य महत् म्हणोनि चरणी वंदी रमा–मोहना

माझी ही प्रियदर्शिनी गमतसे नाम्नी यशोदा भली
जोडोनी सुकुलद्वया निशिदिनी प्रेमादरे सांधिली
संसारी 'गृहकृत्यदक्ष ललना' निर्मीयली भावना
सत्कर्मा करुनी स्वकीयचरिते संतोषवी सज्जना

अन्तर्यामि सदैव शांत म्हणुनी रागावते ना जनी
सर्वांचे गुण गाऊनी धरि न ती हेका कधीही मनी
रागाचा अनुराग होउनि क्षणी ना क्लेश ही देतसे
येई रंगत जीवनी नित अशी काल क्रमा होतसे

# सासु-स्मृति

आपल्या सासुविषयी अतिशय आत्मीयता असलेल्या सुनेला सासूचे निधनानंतर असेच वाटत असेल, नाही ?

'सूनबाई' अशी हांक कानि येई
जीव माझा अति गलबलूनि जाई
स्मृति होई जेधवा गतायूची
जाई तरळूनि प्रसंगावली साची

स्नुषा नोहे परि मानिलीच कन्या
अति मोदे जाहली मनी धन्या
म्हणति मजला "मी किती भाग्यवान
तुझ्या सम मज मिळे गुणी सून"

स्थिती गरीबीची प्रारंभकाळी
जशी वेळ आली निभावूनि नेली
मनोधैर्यतेचे दिले मला पाठ
स्वाभिमानाची दाखविली वाट

कसा काळ गेला तुम्हा संगतीत
पुन्हा नाही येणार होते प्रतीत
कितीदा तरी तो मला बोध केला
कशी विस्मरु मी तया अमृताला

किती गुण सांगू असे बापुडी मी
वर्णावयाला ठरे तोकडी मी
शुभाशीष द्यावा अम्हा लेकरांना
जगी धन्य झाले तुम्हा वंदितांना

# संक्रमण

स्नेहाचा तिळ, प्रेमाचा गुळ
मिसळुनि केला साधा तिळगुळ

स्नेहभाव हा असे तिळाचा
मधुर गोडवा आणि गुळाचा

मकर संक्रमण हे भानूचे
मार्ग दाविते उत्क्रांतीचे

मातृ–पितृ अन् देश ऋण हे
फेड करू या जितुके साहे

ध्येया वरती निष्ठा ठेवू
देशाचे बल–शील वाढवू

# कविश्रेष्ठा

मुदित होउनि विनम्र भावे आलो तव द्वारा
रसिकमान्या असाच फुलू दे तव साहित्त्य फुलोरा
तुझ्याकडे आशेने बघति लाख लाख नजरा
कविश्रेष्ठा अन् नाटककारा घे मानाचा मुजरा

व्यक्तिमत्व तव लोभसवाणे प्रसन्नतेचे तुजला देणे
साहित्याचे अमोल लेणे स्फूर्ति देते करण्या कवने
साहित्याच्या मंदिरास तव कळस आज चढला
यशस्विता ही बघुनि माझ्या मोद मनी भरला

भ्रमर जसा तो लुब्ध होतसे पुष्प–परागावरी
तसेच आकृष्टहि आम्ही तुझिया काव्यावरी
काव्य नाट्य आदिची सरिता अशी निरंतर वाहू दे
पुण्य–सलिली अवगाहन करण्या संधि आम्हाला लाभू दे

ओळख पटली तव हृदयाची किती विशाल अन् श्रीमंत
जन निंदो वा वंदो याची तुज कधी न वाटली खंत
ध्येयपथावरी अविचलित राहुनि करिसी वाङ्मय सेवा
ईशा प्रार्थी जतन करावा आमुचा अमोल ठेवा

२३९८ का०५
22060

# प्रिय रसिका

रसिका प्रेमे स्वागत केले
प्रथमावृत्तीचे

श्रेष्ठ समीक्षक देती आशिष
पुढती जाण्याचे

म्हणुनि निघाली द्वितियावृत्ती
धन्यवाद तुजला

मिळो प्रेरणा अम्हा निरंतर
प्रार्थी ईशाला

REFBK-0022070
REFBK-0022070



# साहित्यिक म्हणतात...

संग्रह छोटा पण निर्मळ, प्रांजळ आहे आपण पतिपत्नींनी दैनंदिन जीवन जगतांना त्यातले बरेवाईट अनुभव घेतांना त्याबद्दलच्या आपल्या प्रतिक्रियांना कवितांचे रुप दिले आहे साधे सरळ हृदय निवेदन म्हणून या कवितांचे मोल मला विशेष वाटले. मनोरमा बाईंच्या कवितात स्त्रीसहज जिव्हाळा, गोडवा, अकृत्रिमता आहे. श्री. जोशींच्या कविता वैचारिकतेकडे अधिक झुकणाऱ्या वाटल्या. आपल्या काव्यसाधनेला माझे धन्यवाद.

शांताबाई शेळके

साधी पण भावपूर्ण अशी काव्यरचना वाचून मनाला आनंद वाटला. आपल्याला काव्यात असाच विरंगुळा सापडावा ही शुभेच्छा.

संजीवनी मराठे

कविवर्य कुसुमाग्रज प्रस्तावनेत म्हणतात तसेच मलाही वाटले. तुमची कविता मन:सांत्वनासाठी आणि आत्मरंजनासाठी जन्मली. तुम्ही उभयतांही कवितेवर फार प्रेम करीत आहां तेव्हां तिनं आपल्या उभयता जन्मदात्यांना समाधान दिले, आणि यातच या साध्या सरळ कवितांचे सार्थक झाले. आपल्या कविता अनेकांना आवडतील.

सौ. पद्मा गोळे

उभयतांची कविता घरेलु वातावरणात रमणारी आहे. त्यांतली सुखदु:खे ही प्रामुख्याने घरकुलाभोवतीच गुंतलेली आहेत. स्त्रियांच्या भावनोत्कट पण संयमी भाषेत पति आणि पुत्र या बद्दलचा जिव्हाळा सौ. जोशी मोठ्या सहजतेने सांगून जातात. श्री. जोशी यांच्या कवितेत पुरुष-स्वभावानुलक्षी असा आशावाद आणि झुंजार ध्येयवादही आहे. उभतांच्या कविप्रतिभेला पांडित्याचा सोस नसला तरी काव्यतत्वाची अचूक ओळखही रसिकाला सहजच दिसते.

वसंत कानेटकर